प्रशासकीय मान्यता आदेश

जलजीवन मिशन सन २०२१-२२ अंतर्गत
अहमदनगर जिल्हयातील नळ पाणीपुरवठा
योजनांची अंदाजपत्रके व आराखडयास
प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
आदेश जा.क्र .ग्रापापु/कार्या/प्रशा-४/ १३० /२०२२
दिनांक १७/२ /२०२२

वाचा :-
१. शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७ दि. १७ ऑक्टोंबर २०१४.
२. शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.८१/पापु-०७ दि. २७ मार्च २०१५.
३. शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७ दि. १५ जुन २०१५.
४. शासन निर्णय क्र जजमि-२०१९/प्र.क्र.१३८/पापु-१०(०७) दि.४ सप्टेंबर २०२०.
५. शासन निर्णय क्र जजमि/०६२०/प्र.क्र.२०/पापु-०७ दि.३० जुन २०२०.
६. शासन निर्णय क्र जजमि/०६०२०/प्र.क्र.२०/पापु-०७ दि.०३ ऑगस्ट २०२०.
७. शासन निर्णय क्र राग्रापे-२०१८/प्र.क्र.४०/पापु-१० दि.२ फेब्रुवारी २०२१.
८. शासन निर्णय क्र जजमि-२०१९/प्र.क्र.१३८(भाग२)/पापु-१० दि.१० मार्च २०२१..
९. तांत्रिक छाननी समितीकडील मंजुर टिपणी दि.
१०. मा.अध्यक्ष पाणी व स्वच्छता मिशन तथा जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील मंजुर टिपणी दि. १७ / ०२ / २०२२.

जलजीवन मिशन अंतर्गत सन २०२१-२२ कृती आराखडयातील, अहमदनगर जिल्हयातील नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी मिळालेली आहे. संदर्भ क्र. ८ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन यांना प्रदान करण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता देण्याच्या अधिकारानुसार, खालील अटीं व शर्तीच्या पूर्तता करण्याच्या अधीन राहून खालील नळ पाणी पुरवठा योजनांना काम निहाय प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तालुका | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | दरडोई खर्च | तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक | वार्षिक कृती आराखडा सन २०२१-२२ नुसार (रेट्रोफिटींग/ नवीन) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पारनेर | नांदुर पठार | ९७,७२,८२५/- | ४,०१२/- | १११ दि. १४.०२.२०२२ | रेट्रोफिटींग |

अटी व शर्ती :-

१. दि. १० मार्च २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींचा अवलंब करावा.
२. सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषद, अहमदनगर मार्फत करण्यात यावी. योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. योजना देखभाल दुरुस्तीसाठी दि **१७ ऑक्टोंबर २०१४** रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.
३. योजनेची कामे विहीत पध्दतीने अनुदान उपलब्धतेनुसार, ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. जादा किंमतीच्या निविदा स्वीकृत करु नयेत. योजनेचे काम प्रशासकीय मान्यता प्राप्त किमतीमध्ये पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी. योजनेची किंमत वाढल्यास त्याला राज्य शासन जबाबदार राहणार नाही व अशा योजना कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यास पात्र राहतील, तसेच त्याची शासनस्तरावर गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
४. सदर योजनेतुन प्रत्येक घरास नळ जोडणी देणे आवश्यक आहे. यादृष्टीने आतापर्यंत दिलेल्या नळ जोडणी व पुढे देण्याच्या नळ जोडणीबाबत IMIS वर माहिती नोंदविणे आवश्यक आहे. नवीन जोडणीबाबत आवश्यक ते नियोजन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील.